# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०९/२०२५ ( सोमवार )**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## २८ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त
## आरोपी अटक, देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक १४/०९/२०२५ रोजी देवलापार पोलीस जुने देवलापार पोलीस स्टेशन समोर जबलपुर शिवणी ते नागपुर हायवे रोडवर नाकाबंदी करत असतांना जबलपुर कडुन एक ट्रक क्रमांक यु.पी ८० के.टी १०५७ येतांना दिसला. वाहन संशयीत वाटल्याने सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहना मध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. वाहन चालक आरोपी १) श्री. राशिद सबु खान वय २६ वर्ष, आणि क्लिनर आरोपी २) श्री. राहुल रामप्रकाष राठोड, वय २७ वर्षे, दोन्ही रा. ग्वालीयर, ता.जि. ग्वालीयर, मध्यप्रदेश राज्य हे वाहनात मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेतले. पोलीसांनी पंचासमक्ष २००० किलो प्रतिबंधीत अन्नपदार्थ सुगंधीत तंबाखु किंमती ८,५०,०००/—रूपये आणि ट्रक क्रमांक यु.पी ८० के.टी १०५७ किंमती २०,००,०००/—रूपये असा एकुण २८,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची वाहतुक केली आहे. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे देवलापार येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **नमुद आरोपीतांना अटक केली आहे.पुढील तपास देवलापार पोलीस करीत आहेत.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद ०९ जनावरांची सुटका,वेलतुर पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— दिनांक १४/०९/२०२५ रोजी वेलतुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. . मिळालेल्या माहीतीच्या आधारे  पोलीसांनी सतर्क पेट्रोलींग केली असता  वेलतुर ते अंभोरा रोड वर मौजा अडेगाव जवळ एक पांढऱ्या रंगाचे बोलेरो पिकअप वाहन येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता वाहन चालकाने वाहन न थांबविता  वेलतुर च्या दिशेने पळ काढला. पोलीसांनी वाहनाचा पाठलाग केला असता चालकाने पिपरी मुंजे गावात रोडवर वाहन सोडुन पळुन गेला .पोलीसांनी बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच. ४० डी.सी ०१३९ या वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये लाहन मोठे एकुण ०९ गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच. ४० डी.सी ०१३९ किंमती ५,००,०००/— रूपये. व ०९ गोवंश जनावरे किंमती १,१०,००० /— रूपये असा एकुण किंमती ६,१०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. सुटका केलेल्या गोवंश जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन गौशाळा येथे दाखल करण्यात आले आहे.

बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच. ४० डीसी ०१३९ चालक आणि मालक यांच्या विरूध्द प्राणी छळ अधिनियम सहकलम आणि महा. पशु संरक्षण अधिनियम सहकलम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. कन्हान पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १४/०९/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा जुनी कामठी शिवारातील राज फार्म हाउस येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी

घटनास्थळी पोहचुन धाड टाकुन आरोपी १) अरविंद कमल उईके, वय ३० वर्षे, २)अमर कमल उईके, वय ३२ वर्षे, दोन्ही रा. ओमनगर कळमना नागपुर, ३)जितेंद्र देवरावजी बारापात्रे, वय ३५ वर्षे, ४)सुमीत वामणराव दुनेदार, वय ३६ वर्षे,५)दुर्गेश गणेश निमजे, वय ३० वर्षे, ६)सतिश नत्थुजी कांबळे, वय ४२ वर्षे, ७)भरत प्रल्हाद पिपळघरे, वय ३४ वर्षे, ८) अमित चमनराव नंदनवार, वय ३२ वर्षे, ९) आशिष चमनराव नंदनवार, वय ३२ वर्षे सर्व रा.विठठल रूख्मीनी मंदीर जवळ तेलीपुरा तांडापेठ नागपुर यांना ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना जागीच पकडले. पोलीसांनी आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम ५,१७०/— रुपये तसेच एकुण ६ अॅड्रॉईड मोबाईल असा एकुण ७०,२२०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक १५/०९/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पारशिवणी हद्दीत पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घोघरा माहादेव ते पारशिवणी रोडवर नाकाबंदी केली असता संशयीत महीद्रां कंपनीचा ट्रॅक्टर क्रमांक एम एच ४० एल ५८७१ त्याला जोडलेली बिना नंबरची ट्रॉलीसह मिळुन आले. वाहन थांबवुन वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, राजु गेंदु वरठी, वय ४६ वर्ष, रा.वार्ड न.२ पालोरा ता. पारशिविणी जि. नागपुर अशी माहीती प्राप्त झाली त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. वाहन मालकाचे नाव रवींद्र प्रभाकर भोगे रा. पारशिविणी जि. नागपूर असे असल्याची माहीती प्राप्त झाली. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन पोलीसांनी पंचासमक्ष वाहनामधुन मधुन १) एक ब्रास रेती किंमती ४,०००/— रूपये आणि २) ट्रॅक्टर क्रमांक एम एच ४० एल ५८७१ त्याला जोडलेली बिना नंबरची ट्रॉलीसह किंमती ५,००,०००/—रूपये असा एकुण **५,०४,०००/—रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४, २१ खान खनिज अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. पारशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक १४/०९/२०२५ रोजी पारशिवणी पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा गुढरी वांढे शिवारात काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन धाड टाकुन आरोपी १) रामदास संतोश इंगोले, वय ६१ वर्ष, रा. चनकापुर, त.सावनेर २) नरेश गनपत देवगडे, वय ४७ वर्ष, रा.गुढरी वांढे, ता. पारशिवनी ३) प्रफुल आनंदराव काळे, वय ३६ वर्ष, रा.गुढरी वांढे, ता. पारशिवनी ४) जयराम उमराव ठाकरे, वय ४२ वर्ष, रा. गवना ता. पारशिवनी, जि.नागपुर यांना ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना जागीच पकडले. तसेच आरोपी क्रमांक ५) गणेश सातनुरकर, ६) शंकर इंगोले ६) प्रतिक मेश्राम तिन्ही रा.सोनेगाव ता.पारशिवनी हे पोलीसांना पाहुन पळुन गेले. पोलीसांनी आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम १,५००/— रूपये , तीन अॅडड्रॉईड मोबाईल आणि दोन मोटर सायकल असा एकुण १,११,५५०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन पारशिवणी येथे १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १६ आरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये,गुन्हे नोंद

दिनांक १४/०९/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस बुटीबोरी** :— पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत आरोपी नामे प्रज्वल मुरलीधर पारधी, रा. जुनीवस्ती बुटटीबोरी ता.जि. नागपुर ,हा एमआयडीसी चौक बुटीबोरी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन कुही :—** कुही पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी नामे रोहन क्रिष्णा काटोले, वय २३ वर्षे, रा. दुबे नगर, हुडकेश्वर, नागपुर, जि. नागपुर, हा मौजा चांपा, शेरअली दर्गाजवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन उमरेड** :— उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी नामे दिपक अरूण बोंडे,वय २३ वर्ष, रा. मंगळवारीपेठ, ता उमरेड येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन काटोल** :— काटोल पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी नामे हरिष उर्फ गोलु शंकर जैस्वाल ,रा. पंचशिलनगर रेल्वे स्टेशन, जवळ काटोल, जि नागपुर हा किल्लावार्ड पेठबुधवार येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन पारशिवणी :—** पारशिवणी पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी क्रं १) धनसिंग बालचंद कोकडिया, वय ७० वर्ष, रा. शिवटेकडी , पारशिवनी ता. पारशिवनी आणि आरोपी क्रं २) शेख अनिस शेख यूनूस, वय ३० वर्ष, रा.सींधीवन, बडा ताजबाग, हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन देवलापार :—** देवलापार पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी नामे १) विजय महादेवराव बिजवे, वय ५५ वर्षे, रा. प्लॉट नं ४० विनोबा ग्राम, कोरके ले आऊट, खरबी हुडकेश्वर बु, जि नागपूर आरोपी क्रं २) संजय नत्थुजी समर्थ, वय ५५ वर्षे, रा. गोरसंघी भंडार, नवी शुक्रवारी, जि नागपूर आणि आरोपी क्रं ३) अरुण विठ्ठलराव कांबळे, वय ६४ वर्षे, रा. न्यु कैलास नगर, नागपुर, जि. नागपूर हे मोरफाटा दर्गाजवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन कन्हान :—** कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी १) अरूण रघुपत सिंग, वय ४८ वर्षे, रा. खदान नं. ०३ टेकाडी हा खदान क्रं ३ परिसरात तसेच आरोपी क्रं २) चिराग नरेश हातागडे, वय २१ वर्षे, रा. पाटील नगर, कांद्री कन्हान, ता. पारशिवनी जि. नागपूर हा प्राथमिक आरोग्य केंद्र, कन्हान जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** कळमेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी क्रमांक १). नामे रोशन सुरेंद्र खरपकर, वय २३ वर्ष, रा. वार्ड नं. ४ बाजार चौक, आरोपी क्रं २) नामे शुभम विष्णु धर्मे, वय २३ वर्ष, रा. वरुड, जि. अमरावती, ह.मु. वार्ड क्र. २ इंदिरा नगर कळमेश्वर आरोपी क्र. ३) सर्वेश्वर बंडुजी बोरकर, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र.०२ आष्टीकला, ता. कळमेश्वर, आरोपी क्रं ४) ऋषीकेश दादारावजी झाडे, वय २२ वर्ष, रा. कोलबास्वामी मठजवळ, वार्ड क्र. ०६ ,कळमेश्वर , आणि ५) किशोर ज्ञानेश्वर बांबल, वय ३१ वर्ष, रा. वार्ड क्र.०३ झेंडा चौक, कळमेश्वर हे आरोपी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण १६ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये १६ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १४/०९/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १५/०९/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री पराग पोटे , पोलीस उप अधिक्षक (गुह),नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत सातगाव, जुनी वस्ती आणि नविन वस्ती येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार,जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. एमआयडीसी चौक येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांना तपासण्यात आले.

सदर कोबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी श्री पराग पोटे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले. सदर कारवाईत स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकचे पोलीस अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने